"महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचा स्वॉट (SWOT) तंत्रानुसार एक चिकित्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आंतरविद्याशाखे अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

* संशोधक *

प्रा.शैलेश गणपतराव गडलवाड

(एम.लिब.ॲन्ड आय.एस्सी, नेट)

ग्रंथपाल

नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ.बाळापूर

ता.कळमनूरी जि. हिंगोली

* मार्गदर्शक *

डॉ. देशपांडे अपर्णा

(एम.लिब.ॲन्ड आय.एस्सी, पीएच.डी.)

ग्रंथपाल

बी. रघूनाथ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै - २०१९

"महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयांचा स्वॉट (SWOT) तंत्रानुसार एक चिकित्सक अभ्यास"

१. प्रस्तावणा (Introduction):

संशोधन म्हणजे ज्ञानाची पध्दतशीर मांडणी, कोणत्याही समस्येचे अध्ययन करताना दृष्टीने विषयाची मांडणी करुन सत्य शोधण्याचा प्रयत्न केला जातो. कार्ल पिर्यसन यांच्या मते, "सत्याचं आकलन करण्याचा जवळचा रस्ता नाही. विश्वासाबाबतचे ज्ञान करुन घेण्याचा शास्त्रीय पध्दती गवाक्ष खेरीज दुसरा मार्ग नाही. "या अध्ययनामध्ये महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचे स्वॉट (SWOT) तंत्रानुसार विश्लेषणात्मक अध्ययन केले जाणार आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील विविध विचार तत्वे, प्रणाली, प्रवाह हे जितके परिपूर्ण असतील तितकी या पध्दतीतून शिकून बाहेर पडणारी पिढी समृध्द असणार आहे. सध्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड परिवर्तन घडून येत आहे. तेव्हा इतर क्षेत्रांमध्ये योग्य दिशेने प्रगती करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीचा फार मोठा फायदा होऊ शकतो. संशोधनातील प्रगत तंत्राचा वापर करुन समस्या सोडविता येऊ शकतात. जागतिकीकरणानंतर जिवनाच्या सर्व क्षेत्रात गती आली आहे. प्रश्नाचे स्वरुपही बदलेले आहे. देशातील व राज्यातील बदलत्या परिस्थितीचा आशय लक्षात घेऊन आगामी काळात शिक्षणाच्या सर्वाधिक प्रसाराचे कार्यक्रम नेण्याने कार्यवाही करण्याची जशी गरज आहे तशिच शिक्षण कार्यक्रमाची व संबंधित बाबींची पूर्नरचना संकलितपणे व योजनाबध्दरितीने करण्याची गरज निर्माण झाली आहे. ही गरज लक्षात घेऊन या संशोधनाची आखणी केली आहे. शैक्षणिक नियोजन हे एक साधन आहे आणि क्षेत्रातील सर्व नागरिकाचा कर्तृत्वास वा देऊन राष्ट्रांची साधनसंपत्ती सतत वाढती ठेवणे हे साध्ये आहे. या संशोधनात स्वॉट (SWOT) तंत्रानुसार महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. शिक्षणातील परिपूर्णता त्यामध्ये होणाऱ्या मुलगामी संशोधनाचे प्राप्त होणार

आहे. त्या दृष्टीने आपणास प्रश्नाच्या उत्तरची जाण होणे आवश्यक आहे. या सर्व प्रश्नाचे उत्तर सततच्या संशोधनाचे माहिती होणार आहे. संशोधनात निघालेल्या निष्कर्षाच्या आधारे केलेले व्यवस्थापना विषयक बदल अधिक यशस्वी ठरतात. ग्रंथालय क्षेत्रात धोरण ठरविणाऱ्यांना संशोधन वृत्तीची फारच गरज आहे. ग्रंथालय व्यवस्थापन अभ्यासक्रम, नियोजन, संयोजन ग्रंथालय साहित्याचे नियोजन निरीक्षण व मुल्यांकन इत्यादी विविध क्षेत्रातील बाबींबद्दल निर्णय घेत असतांना कोणाचे मत अथवा हितसंबंध न पाहाता संशोधनावर आधारीत निर्णय घेऊन कार्य करणे जास्त उचित ठरेल. या पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.

डॉ. शि.रा. रंगनाथन यांच्या पाचव्या नियमानूसार ग्रंथालयाशास्त्र हे वृध्दींगत होणारी संस्था आहे याच कारणामुळे ग्रंथालय हे प्रत्येक दिवशी प्रत्येक महिन्यास व वर्षात वृध्दीगत होत आहे.

गेल्या पन्नास वर्षाच्या काळात ग्रंथालय हे इतर संस्था प्रमाणे वृध्दींगत पावले आहे. ग्रंथालय हे इतर संस्थाप्रमाणे त्यांच्या अंतर्गत घटकांमुळे शक्य झाले. दुसरे महत्वाचे म्हणजे माहितीचा विस्फोट, भरमसाठ प्रकाशन माहिती तंत्रज्ञान जागतिकीकरण इत्यादी कारणांमुळे माहिती ग्रंथालयाच्या व्यवस्थापनावर बदल घडून आला.

व्यवस्थापन म्हणजे जेम्स लुंडी यांच्या मतानुसार " विशिष्ट उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या प्रयत्नाचे नियोजन करण्याचे समन्वय साधण्याचे, प्रेरणात देण्याचे नियंत्रण करण्याचे कार्य म्हणजे व्यवस्थापन होय."

व्यवस्थापकीय कार्यामध्ये पुढील कार्याचा समावेश होतो. नियोजन, संघटन, मनुष्यबळ, नेतृत्व ही पाच कार्य आहेत. त्यांच्या आधारे चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करता येते. व्यूहात्मक नियोजन यशवस्वी व्हावे या करिता काही तंत्रे निर्माण करण्यात आली. ती तंत्रे पुढीलप्रमाणे, उद्दिष्टये प्रेरित व्यवस्थापन (MBO) व्यूहात्मक नियोजन (Strategic Planning, SWOT) STEP या नावाची विश्लेषण पध्दती आहे.

संशोधनाचे महत्व :

ग्रंथालयीन सेवेचा पैलू आहे. ग्रंथालय वर्धिष्णू संस्था आहे. ग्रंथालयात अनेक प्रकारचे काम असतात. कोणत्या संस्था, संघ किंवा संघटनेच्या कुशल व्यवस्थापनासाठी कामाचे विभाजन करणे आवश्यक असते. ग्रंथालयात अनेक प्रकारचे कामे असतात. त्याचे वेगवेगळे विभाग पाडले तर प्रत्येक विभागाच्या कामाची जबाबदारी स्वतंत्र्य रुपाने कर्मचाऱ्यांवर टाकता येते आणि ते काम सुरळीतपणे होऊ शकते. प्रत्येक विभागात ही जाणीव असली पाहिजे. त्यात नेमकी कोणती कामे करावी लागतात. म्हणून ग्रंथालयाच्या कामाचे वेगवेगळे विभाग पाडणे आवश्यक आहे.

१. सामान्य प्रशासन विभाग

२. ग्रंथालय विभाग

३. ग्रंथ सोपस्कार किंवा तांत्रिक विभाग

४. देवघेव विभाग

५. नियत-कालित विभाग

६. संदर्भ विभाग

कोणत्याही संस्थेला आपली उद्दिष्टये साध्य करण्यासाठी व्यवस्थापनाची आवश्यकता असते. आणि व्यवस्थापनाची सर्वात महत्वाची कार्य म्हणजे नियोजन, संघटन, मनुष्यबळ, नेतृत्व आणि नियंत्रण ग्रंथालयाचे चांगले विभाजन होण्यासाठी काही तंत्रे निर्माण करण्यात आली. त्यात SWOT हे महत्वपूर्ण तंत्र होय. हे एक व्यवस्थापकीय तंत्र आहे. ही संकल्पना औद्योगिक क्षेत्रातून आली आहे.

SWOT म्हणजे Strength जमेची बाजू, Weakness कमकुवत बाजू, Opportunities व्यवस्थापकीय संधी, Threats अडथळे यांचे विश्लेषण होय.

या संशोधनामुळे एखाद्या ग्रंथालयाचे SWOT तंत्रानूसार विश्लेषण करावयाचे असल्यास त्या संस्थेतील धोक्याचे रुपांतर संधीत, कमतरता आणि दोष यांचे रुपांतर बलस्थानाच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शक ठरते. त्यांना स्वॉट तंत्रानूसार ग्रंथालयाचे विश्लेषण

करुन सक्षम ग्रंथालय व्यवस्थापन करण्याबाबत मार्गदर्शक ठरेल. सदरील संशोधनामूळे ग्रंथपाल ग्रंथालय कर्मचारी व वाचक यांना ग्रंथालयाच्या विश्लेषणामुळे ग्रंथालयाची इत्यंभूत ओळख होईल. त्याचप्रमाणे सदरील ग्रंथालयांना आपले दोष समजून ते सुधारुन ग्रंथालयांचा विकास करता येईल व ग्रंथालयाची वाढ होईल. अशा प्रकारे सर्व ग्रंथालयाचा स्वॉट तंत्रानूसार अभ्यास करण्याचा फायदा होईल.

२. पुर्वसाहित्याचा शोध (Review of Literature) :

प्रस्तुत संशोधन आराखडा तयार करत असतांना खालील वाचनसाहित्याचा शोध घेण्यात आला आहे.

१. डॉ. नमिता खोत आणि प्रा.एस.एस.जाधव (२०१०) : ग्रंथालय व्यवस्थापनात (SWOT) विश्लेषण पध्दतीची उपयुक्तता या लेखामध्ये त्यांनी ग्रंथालयाचे व्यवस्थापन करत असतांना SWOT हे तंत्र किती उपयुक्त आहे याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

२. डॉ. एस.आर.सुळसुळे (२०१३) ग्रंथालय व्यवस्थापनात SWOT तंत्राचा वापर कशा पध्दतीने करता येऊ शकतो. यावर सविस्तर चर्चा त्यांच्या लेखामध्ये करण्यात आलेली आहे. SWOT तंत्र म्हणजे नेमके काय याचा सविस्तर उहापोह करण्यात आलेला आहे.

३. प्रा.जी.व्ही. लोणारे (२०१३) आधुनिक ग्रंथालय व्यवस्थापन : SWOT विश्लेषण या लेखामध्ये त्यांनी आपली ताकद कशी उपयोगात आणू शकतो. आपल्या उणिवा कशा थांबवता येतील व आपल्याला संधी कशा प्राप्त करता येतील आणि आपल्या भयापासून कसे परावृत होता येईल हे सांगितले आहे.

४. गारजे, विजयकुमार काशिनाथ (२०१३) महाविद्यालयीन ग्रंथालयात SWOT विश्लेषण: समस्या व उपाय या लेखामध्ये त्यांनी महाविद्यालयीन ग्रंथालयात SWOT तंत्राची उपयुक्तता तसेच समस्या व उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

५. नागरगोजे, एम.एन. (२००७) औसा येथील श्री.कुमारस्वामी महाविद्यालय ग्रंथालयाचे SWOT तंत्रानूसार विश्लेषणात्मक अध्ययन या संशोधन प्रकल्पामध्ये, ग्रंथालयाचा

ग्रंथसंग्रह चांगला आहे. ग्रंथालयाची इमारत स्वतंत्र आहे व ग्रंथालयाचा विकास विद्यापीठ अनुदानातून चांगला झाला आहे.

६. फड, एम.एम. (२००६) औरंगाबाद येथील दक्षिण केसरी मुनी मिश्रीलालजी होमीओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय ग्रंथालयाचे SWOT तंत्रानुसार विश्लेषण सदरील प्रकल्पांतर्गत त्यांनी सदरील महाविद्यालयाचे SWOT तंत्रानुसार सविस्तर अभ्यास केलेला आहे.

७. निकोरो, सत्यप्रकाश (२००७) आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन या ग्रंथामध्ये व्यवस्थापना बरोबर SWOT विश्लेषण दिलेले आहे. यामध्ये SWOT ही स्पष्ट केलेली आहे. ती खालीलप्रमाणे

S - Strengths	- अंतर्गत ताकद
W - Weaknesses	- कमतरता, उणिवा
O - Opportunities	- संधी
T - Threats	- संभाव्य धोके ही संज्ञा स्पष्ट केलेली आहे.

8. **Henry N. Kemoni and Patrick Ngulube, (2007)** recommends that Cap 19 be revised to ensure that the records management component is explicitly stated in the Act, unlike the current case where archives management is given more prominence in the title of the act than records management. This would be in line with the practice in other countries such as Botswana, India, the United Kingdom, Australia, New Zealand, South Africa and United States of America.

9. The study identified opportunities which could be utilized by the Director of KNADS to enhance the profile management of public records, using the current Public Archives Act. It is also recommended that the Director of KNADS takes advantage of the opportunities to enhance the management of

public records and make record keeping activities visible. These include the clamour for transparency and accountability in the public service, the fight against corruption and the on-going public sector reform programmes. This recommendation would that efficient information and records management provides the basis for poverty reduction, accountability and effective management of state resources, protection of rights and entitlements, services to citizens, anti-corruption strategies and the rule of law, as noted by the IRMT (2005). Efficiency.

10. **Skakeel Ahmad Khan (2011)** finds tha SWOT anlysis depicts a vivid picture of Museum's strength, weaknesses, opportunities and threats. Analysis shows that Bahawalpur Museum is wealthy in Cholistani Culture. It has a large number of items which are reflecting the splendid ancient history of Bahawalpur and Cholistani people. Its different GaHoies and promotional activities are valuable in protecting and promoting Cholistani traditions among the community. SWOT analysis fotmd that it has numerous opportunities for better preservation and publicity of its fascinating objects. The study also indicates the weaknesses which are being faced by the Museum. In a sequel, it is concluded that strength of the Museum is needed to be focused and maintained in ordierto make use of available opportunities to fully respond to the threats.

11. **Dr. P.K. Suresh Kumar (2012)** All University Librarians in Kerala have a positive opinion towards marketing but none of the libraries has specific allocation of funds or a designated person or a marketing wing for marketing of information products and services. Most of the libraries

identified certain problems encountered in the marketing of information products and services such as lack of trained staff, less demand from the users for the existing resources and services. Through weeding out of documents and survey of the users to know their requirements and their expectations of the library, these problems can be tackled. The SWOT analysis shows all the university libraries in Kerala with their strengths and opportunities can easily overcome the threats and weakness with appropriate positioning and marketing strategies. An intensive effort is required from the part of the top management of the library, staff, and authorities of the concerned universities to overcome the listed weakness. All the university libraries in Kerala have enough potential to market their information products and services through a strategic marketing approach, atrick Mapulanga (2013). While there is no guarantee that strategic planning may produce the expected results, there are increasing cases indicating that strategic planning can contribute towards improving organizations as ling as leadership and decision makers are willing to invest the time, attention, and necessary resources. Strategic planning in UNIMA have failed to take into account library and information services. The future can be both exciting and challenging for libraries and information services, but there is a need for UNIMA libraries to develop strategic plans, It is recommended that for future strategic plans, librarians should lobby management to take into account internal and external scanning, and establishing mission and visions statements for UNIMA libraries, before drawing appropriate action plans on how the organization intends to get to the envisioned future. A strategic

plan should involve all employees, stakeholders, and library users. The study also recommends that the strategic plans should nstantly be reviewed, monitored, and adapted to the changing environment.

12. **Mangesh Talmale and Avinash Humbre (2012)** SWOT analysis helps in evaluating by using your strength to overcome Weaknesses, using opportunities to overcome. Threats and take appropriate strategies as an action.Changes are enforced by many forces such as technology, demographic features, economic characters etc. Some of the technology issues at the information providers/ vendors will be solved if these issues are discussed with them while signing up the consortia licenses. Solutions to issues at the member libraries end will be found collectively by member libraries agreeing to use common library automation systems, standard and formats. Hence, NLIST programme would successfully fill in the serious gap of providing access of resources to colleges in India.

३.१ संशोधनाची उद्दिष्टये (Objectives of research):

१. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयातील सर्व विभागातील बलस्थाने जाणुन घेणे.

२. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयातील सर्व विभागातील उनिवाचा अभ्यास करणे.

३. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयातील सर्व विभागातील विकासाच्या संधी आणि अडथळे याचा अभ्यास करणे.

४. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचे स्वॉट विश्लेषणाच्या आधारे मूल्यमापन करुन उपाययोजना सुचवणे.

५. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयातील वाचकाच्या गरजाचा अभ्यास करणे.

३.२ संशोधनाचे गृहीतके (Proposed hypothesis)

१. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयातील काही विभाग हे त्या ग्रंथालयाचे बलस्थाने आहे.

२. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयात काही विभागामध्ये उणिवा आहेत.

३. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालय प्रशासनास अडथळे आहेत व सुधारणा करण्यास संधीही आहे.

४. संशोधन पध्दती (Methodology to be adopted)

२१ व्या शतकात संशोधनाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. प्रत्येक विषयामध्ये संशोधन होत आहे. हे संशोधन करण्यासाठी वेगवेगळ्या संशोधन पध्दती वापरण्यात येत असतात.

त्यामध्ये तीन संशोधन पध्दती प्रचलीत आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

१. ऐतिहासिक संशोधन पध्दती :

२. प्रायोगिक संशोधन पध्दती

३. वर्णनात्मक संशोधन पध्दती

या तीन संशोधन पध्दती आहेत. या संशोधन वर्णनात्मक व सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

वर्णनात्मक संशोधन पध्दती :

वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये एखादी सामाजिक घटना, कार्य, उपक्रम आणि योजना यांची साप्रंतस्थिती काय आहे? याचा सखोल अभ्यास करुन त्यातील गुण दोषाची वस्तुनिष्ठ पणे चिकित्सा करतो, या प्रकारच्या संशोधनात शोध घेणे हे उद्दिष्टे असते. सत्य परिस्थितीचा चिकित्सकपणे शोध घेतल्यानंतर आणि योजनेतील गुणदोषांची चर्चा केल्यावर संशोधक परिस्थिती सुधारण्यासाठी मार्गदर्शक सुचना करु शकतो. अशा प्रकारच्या संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दती असे म्हणतात. या ठिकाणी वर्णनात्मक संशोधनात तथ्य संकलीत करण्यासाठी वैज्ञानिक तंत्राचा आधार घ्यावा लागतो. यासाठी मुलाखत अनुसूची या

साधनांचा वापर करण्यात येईल. वर्णनात्मक संशोधन पध्दतीची काही वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

१. वस्तुनिष्ठपणे गोळा केलेली माहिती

२. गोळा केलेल्या माहितीचे तंत्रशुध्द विश्लेषण

३. व्यवस्थापन

४. व्यवस्थापनाला लाभलेली चिंतनाचे पार्श्वभूमी

प्रस्तुत संशोधनासाठी ही पार्श्वभूमी म्हणजे हे संशोधन व्यवस्थापनावर आधारीत आहेत आणि या अनुषंगाने ग्रंथालयाचे व्यवस्थापन करावयाचे आहे व ग्रंथालयाचे गुण दोषीची सर्व स्तर, रुपरेषा समोर आणण्यासाठी या संशोधन पध्दतीचा संशोधनाअंतर्गत वापर करण्यात येईल. म्हणून या ठिकाणी सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करुन प्रश्नावली व मुलाखतीद्वारे अभ्यास केला जाणार आहे.

सर्वेक्षण संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन विषय हा महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचे स्वॉट तंत्रानुसार विश्लेषण केले जाणार आहे. याच्या अभ्यासाठी सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ०४ कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचे स्वॉट तंत्रानुसार सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यामुळे ठळक निष्कर्ष काढता येतो. सदर संशोधनपर अभ्यासास पूर्णत्व येण्यासाठी स्वॉट तंत्राचे ग्रंथालयातील महत्व त्याची बाजू तसेच ग्रंथपालांच्या मुलाखती व प्रश्नावलीद्वारे हा अभ्यास करावयाचा आहे. यातून मिळालेल्या उत्तरातून ठळक बाबी निष्कर्ष म्हणून मांडता येतील.

संशोधन करतेवेळेस प्रश्नावली पध्दतीचा उपयोग करायचा आहे :

प्रस्तूत संशोधन शिक्षणाच्या अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली पध्दतीची निवड करुन संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या पध्दतीचा वापर करायचा आहे. त्यासाठी आपल्या आवश्यक असलेली माहिती ही संदर्भ साहित्य, निरीक्षणे, प्रयोग, सर्वेक्षण अशा वेगवेगळया पध्दतीने मिळवता येते. आपल्याला सर्वेक्षण करतेवेळेस प्रश्नावली

पध्दतीचा वापर करायचा असून त्याचा पहिला प्रकार म्हणजे क्षेत्रअभ्यास तर दुसरा प्रकार म्हणजे प्रश्नावली हा होय. प्रकल्पाच्या विषयाच्या संदर्भात समाजातल्या वेगवेगळया थरांतील अनेक व्यक्तीकडून जेव्हा माहिती मिळवायची असते, तेव्हा ती प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळवता येते. विशेषत: पारंपारिक ज्ञान आणि दैनंदिन जीवनात त्याचा केला जाणारा वापर याविषयी माहिती मिळविण्यासाठी त्याचप्रकारे आपल्या एखाद्या ग्रंथालयाची पूर्णपणे माहिती घेण्यासाठी आपण आपल्याला जे प्रश्न सांगतो त्याची योग्य ती माहिती योग्य त्यावेळी आपल्याला मिळवता येते. त्याच्यासाठी आपल्या प्रश्नावली पध्दतीचा वापर चांगल्याप्रकारे प्रभावीपणे वापरता येते. आपल्या विषयानुसार प्रश्नावली तयार करा. प्रश्नावली तयार करणे हे कौशल्याचे काम आहे. त्यामुळे प्रश्नावली तयार करताना विद्यार्थ्यांना कर्मचाऱ्यांना किंवा एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीची मदत घेणे आवश्यक ठरते.

प्रश्नावली छापील स्वरुपात तयार केल्यास या प्रश्नावलीच्या छायांकीत प्रती काढून त्या वेगवेगळया व्यक्तींना देता येतात आणि प्रश्नावलीमध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडून भरुन घेता येतात.

५. संशोधनाचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्व (Importance of Study)

५.१.राष्ट्रीय : (National Status) महाराष्ट्रातील प्रमुख चार विद्यापीठाच्या संशोधनाच्या आधारे राष्ट्रीय पातळीवर या विद्यापीठाने विविध क्षेत्रात आधुनिक तंत्राआधारे मौलीक योगदान दिले आहे. आज जो कृषी विकास आपणास दिसत आहे. त्याचे श्रेय या महाराष्ट्रातील चार विद्यापीठाना द्यावे लागेल. डॉ.पंजाबराव देशमुख याच्या काळात आणि राष्ट्रीय आणि आंतर राष्ट्रीय स्तरावर कृषी क्षेत्राचा सर्वागीण विकास घडून आणण्यासाठी यांनी फार मौलिक उदाहरण दिले.

या चार कृषी विद्यापीठाचा संशोधनाचा संपूर्ण भारतातील इतर कृषी विद्यापीठांना सुध्दा मदत झाली.

५.२.आंतरराष्ट्रीय (International Status):- महाराष्ट्रातील प्रमुख चार कृषी विद्यापीठातील संशोधनाचा फायदा हा राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर सुध्दा फायदा

झालेला आहे. या कृषी विद्यापीठाचा भारताशेजारील राष्ट्र आहेत. त्यामध्ये ब्रम्हदेश, नेपाळ, श्रीलंका, भुतान, चीन आणि आशिया या प्रमुख देशांना सुध्दा महाराष्ट्रातील प्रमुख चार कृषी विद्यापीठातील संशोधनाचा फायदा झालेला आहे.

अशाप्रकारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठे ही उपयुक्त ठरलेली आहेत.

५.३.संशोधनाची व्याप्ती (Significance and Scope Of Study):

प्रस्तूत संशोधन विषयाचा अभ्यास करीत असताना ग्रंथालयाचे महत्व मानवीजीवनात / मानवी व्यक्ती विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहेत. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे ही कृषी व्यवसाय शेतकऱ्यासाठी यासाठी मार्गदर्शन ठरतो. त्यामुळे या कृषी विद्यापीठाचे आधुनिक तंत्राआधारे शेतीविकास घडलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे ग्रंथालयाचा आधार या विकासासाठी कारणीभूत ठरला. त्यामुळे या कृषी विद्यापीठातील ग्रंथालयाचे महत्व आपल्याला नाकारता येत नाही. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी प्रमुख चार विद्यापीठापैकी राहुरी आणि अकोला या दोन विद्यापीठाचा फार मोठा हातभार लागलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी या दोन विद्यापीठे ग्रंथालयाचा आपण अभ्यास करणार आहोत. या ग्रंथालयामुळे महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास झाला आहे. या कृषी विद्यापीठाआधारे नवजागृती झाली व या संशोधन करुन संशोधकाला व शेतकऱ्याला याचा फायदा झाला.

मर्यादा :- महाराष्ट्रातील प्रमुख चार कृषी विद्यापीठापैकी त्यामध्ये परभणी आणि दापोली या दोन विद्यापीठापेक्षा कमी आहे. याचे कारण या दोन विद्यापीठामध्ये या दोन कृषी विद्यापीठ ग्रंथालयामध्ये ग्रंथालयाची पुस्तकाची कमतरता व कृषी संशोधनामध्ये कमतरता ही प्रमुख कार्य सांगता येते. प्रस्तुत संशोधनाची ही फक्त महाराष्ट्रातील ०४ कृषी विद्यापीठ ग्रंथालयापूर्ती मर्यादीतच आहे. ती खालीलप्रमाणे दर्शविली आहेत.

1. Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth Dapoli.
2. Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth Akola.
3. Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth Parbhani.

4..Mahatma Phule Krishi Vidyapeeth Rahuri

६.प्रकरण योजना : Proposed Work Plan /Proposed Chapter Scheme .

प्रस्तुत संशोधनात खालीलप्रमाणे प्रकरणाची योजना केलेली आहे.

- **प्रकरण पहिले :** प्रस्तावना
- **प्रकरण दुसरे :** पुर्वअभ्यासाचे समालोचन
- **प्रकरण तिसरे :** संशोधन पध्दती
- **प्रकरण चौथे :** माहितीचे संकलन आणि विश्लेषण
- **प्रकरण पाचवे :** निष्कर्ष व सूचना

६.१ संशोधनाचा कालावधी : (Year wise Plan of work)

प्रस्तुत संशोधन हे तीन वर्षाच्या कालावधीसाठी पूर्ण करण्याचे योजले आहे त्यासाठी लागणारा कालावधी खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेले आहे.

अ.क्र.	प्रकरणाचे क्रमांक	प्रकरणाचे नांव	प्रकरणासाठी लागणारा कालावधी
(१)	प्रकरण पहिले	प्रस्तावना	चार महिने (०४)
(२)	प्रकरण दुसरे	पूर्वअभ्यासाचे समालोचन	आठ महिने (०८)
(३)	प्रकरण तिसरे	संशोधन पध्दती	सहा महिने (०६)
(४)	प्रकरण चौथे	माहितीचे संकलन आणि विश्लेषण	आठ महिने (०८)
(५)	प्रकरण पाचवे	निष्कर्ष व सुचना	चार महिने (०४)

७.संदर्भसूची (References):

१. पिएर्सन, कार्ल. (१९११). द. ग्रामर ऑफ सायन्स लंडन: पृक्र. १०-१२.

२. बापट, भा.गो. (१९८३). शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास पुणे : व्हिनस प्रकाशन. पृक्र. ११.

३. कित्ता, पृ.क्र. १२.

४. जोशी, सी.जी. आणि जोशी ए.सी. (२००३). व्यवसाय व्यवस्थापन. कोल्हापूर : फडके प्रकाशन, पृ.क्र. ११६.

५. बुशा, चार्ल आणि हार्टर, स्टिफन. (२०००) संशोधन व्याख्या आणि पध्दती. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. पृ.क्र. ६२.

६. Gopal. M.H. (१९७०). An Introduction to Research Procedure Social Science. Bombay: Asia Publication House. Page No. १६७.

७. Kumar, K. (१९९२), Research Methodology in Library and Information Science. New Delhi : Anand Publication Page No.१०.

८. खैरनार, दिलीप आणि राऊत, किशोर (२००४). सामाजिक संशोधन पध्दती औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन. पृ.क्र. १६.

९. खोत, नमिता आणि जाधव, एस.एस. (२०१०), ग्रंथालय व्यवस्थापनात SWOT विश्लेषण पध्दतीची उपयुक्तता, ज्ञानगंगोत्री : नाशिक.

१०. मिश्रा. व्हि.एन. आणि कुलकर्णी, जे.एन. (२०१२). ग्रंथालय व्यवस्थापनाची आधुनिक तंत्रे. लातूर : अरुणा प्रकाशन. पृ.क्र. १०२-११४.

११. www.library.web.ca/home/swotanalyasis.pdf Brulsn.Erikde Prepared, Library Swot analysis January 25.000.

मार्गदर्शक
डॉ.देशपांडे अपर्णा

संशोधक
प्रा.गडलवाड शैलेश गणपतराव